जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदास दि. १ नोब्हेंबर,२०१२ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले मानधन व इतर सेवाशर्ती राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या जिल्हास्तरीय डाटा एन्ट्री ऑपरेटर पदास लागू करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-1113/ . .45/पापु-07**

मंत्रालय

मुंबई ४०० ०३२

तारीख: 17 एप्रिल, 2013

**वाचा –**

1) शासन पत्र क्र.डेटाऑ **2010/ . .11/**पापु-**25,** दि.**6** सप्टेंबर,**2010**

2) **शासन निर्णय क्रमांकः** क्र.संकिर्ण-2012/ . .72/ पापु- 07, दि. 1 नोव्हेंबर, 2012

**प्रस्तावना –**

संदर्भ क्र.**1** येथिल शासन पत्रान्वये भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावर डाटा एन्ट्री ऑपरेटरचे एक पद भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.**2** येथिल शासन निर्णयान्वये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाची स्थापना करण्यात येऊन**,** त्या कक्षाकरिता कंत्राटी पद्धतीने नियुक्त करावयाच्या विषय तज्ञ**,** डाटा एन्ट्री ऑपरेटर व इतर कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवाशर्ती व मानधनाबाबत मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. संदर्भ क्र.**1** येथिल शासन पत्रान्वये भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावर डाटा एन्ट्री ऑपरेटरचे एक पद भरण्यास मान्यता देताना या पदावरिल व्यक्तीस दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी कोणत्याही परिस्थितीत ठेवण्यात येऊ नये अशा सुचना देण्यात आल्या आहेत. दोन वर्षाच्या कालावधीनंतर पुर्ननियुक्ती देता येत नसल्यामुळे अनेक जिल्ह्यांमधील डाटा एन्ट्री ऑपरेटरच्या सेवा खंडीत झाल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची ऑनलाईन व ऑफलाईन माहिती भरण्यात समस्या निर्माण झाल्या आहेत**,** असे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. तसेच राष्ट्रिय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत (भारत निर्माण कार्यक्रम) कार्यकारी अभियंता**,** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**,** जि.प. यांच्या संनियंत्रणाखाली जिल्हास्तरावर भरण्यात येणारे डाटा एन्ट्री ऑपरेटर व जिल्हा पाणी व स्वच्छत मिशन कक्षाचे डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या मासिक मानधनामध्ये देखील तफावत आहे. त्यामुळे संदर्भ क्र.**2** येथिल शासन निर्णयान्वये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्याकरिता विहित करण्यात आलेल्या सेवाशर्ती व मानधनाबाबतची मार्गदर्शक तत्वे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावर कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात येणा-या डाटा एन्ट्री ऑपरेटर पदास लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय –**

प्रस्तावनेतील माहिती विचारात घेता संदर्भ क्र.1 येथिल शासन पत्र रद्द करुन संदर्भ क्र. 2 येथिल शासन निर्णयान्वये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदाकरिता विहित करण्यात आलेल्या सेवाशर्ती, मानधन, नियुक्ती, पुर्ननियुक्ती, करार व इतर सर्व मार्गदर्शक तत्वे राष्ट्रिय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जि.प. यांच्या संनियंत्रणाखाली जिल्हास्तरावर कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात येणा-या डाटा एन्ट्री ऑपरेटर पदास लागू करण्यात येत आहेत.

2. या परिपत्रकातील सुचना सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकानंतर कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात येणा-या डाटा एन्ट्री ऑपरेटर्सना लागू होतील.

3. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201304171125078828 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KHADSE RASIK A

Digitally signed by KHADSE RASIK A
DN: CN = KHADSE RASIK A, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation
Reason: I am approving this document
Date: 2013.04.26 14:57:34 +05'30'

**(र.अं.खडसे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

1) मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
2) मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
3) विधानमंडळ सदस्य (सर्व)
4) मुख्य सचिव यांचे उप सचिव
5) प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज
6) प्रधान सचिव (वित्त),वित्त विभाग
7) प्रधान सचिव, नियोजन विभाग
8) विभागीय आयुक्त (सर्व)
9) जिल्हाधिकारी (सर्व)
10) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
11) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
12) संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर,नवी मुंबई
13) अति.संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर,नवी मुंबई
14) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
15) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
16) सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
17) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
18) महालेखापाल, महाराष्ट्र -1 मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
19) महालेखापाल, महाराष्ट्र -2 नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
20) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
21) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
22) सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
23) सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
24) सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
25) सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
26) निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-07